आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० ऑगस्ट २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- मुंबई आणि रत्नागिरीत पावसाचा जोर ओसरला, इतरत्र अजूनही संततधार, पूरपरिस्थितीमुळे राज्यात गेल्या २४ तासांत १० जणांचा मृत्यू

- उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांचा उमेदवारी अर्ज दाखल

- आयआयएम अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्था सुधारणा विधेयक २०२५ ला संसदेची मंजुरी / ऑनलाइन गेमिंगबाबतचं विधेयक लोकसभेत मंजूर

**आणि**

- उद्यासाठी ठाणे, पुणे, नाशिक आणि सातारा जिल्ह्याला हवामान विभागाचा रेड अलर्ट, मुंबई, पालघर आणि रायगडला ऑरेंज अलर्ट

**<><><><>**

राज्यात मुंबई आणि रत्नागिरीत पावसाचा जोर आज सकाळपासून ओसरू लागला आहे. मात्र अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर कायम असल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयातल्या राज्य आपत्ती नियंत्रण कक्षाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

राज्यात जिथं आवश्यकता आहे तिथं राज्यस्तरीय आणि केंद्रस्तरीय आपत्ती निवारण दलाची मदत दिली जाईल असं मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी म्हटलं आहे. मंत्रालयातल्या राज्य आपत्ती कार्यवाही केंद्राला त्यांनी आज भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या नद्यांच्या पातळीवर प्रशासनानं नीट लक्ष ठेवावं, पुरबाधित क्षेत्रातल्या नागरिकांना तातडीनं सुरक्षित स्थळी हलवावं, हवामान अंदाजांच्या ताज्या बातम्या नागरिकांपर्यंत पोचवाव्यात,  अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

राज्यातल्या अनेक नद्या धोक्याच्या पातळीच्या वरून वाहत असून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. पूरपरिस्थितीमुळे राज्यात गेल्या २४ तासांत १० जणांचा मृत्यू झाल्याचं राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागानं सांगितलं आहे.

**नवी मुंबई** क्षेत्राला पाणीपुरवठा करणारं मोरबे धरण १०० टक्के भरले आहे. आज पहाटे मोरबे धरणाचे दरवाजे २५ सेंटिमीटरनं उघडून धावरी नदीपात्रात विसर्ग सुरु करण्यात आला. नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये असं आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेनं केलं आहे.

**पालघर** जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू आहे. नालासोपारा, वसई, विरार भागात आज देखील सखल भागात पाणी साचलं असून अनेक भागातून नागरिकांना बाहेर काढून निवारा केंद्रात हलवलं  आहे.

**सातारा** जिल्ह्यात कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाऊस वाढला आहे. कोयना धरणासह जिल्ह्यातली इतर धरणं ९५ टक्क्यांच्या वर भरली असून पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोयना नदीपात्रात विसर्ग सुरु आहे. सातारा शहरात काही रस्ते वाहतुकीसाठी बंद केले असून नागरिकांचं स्थलांतर केलं आहे.

**नाशिक**मध्ये काल रात्रीपासून पाऊस पुन्हा सुरू झाला आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात संततधार सुरू असल्यानं आज सकाळी आठ वाजल्यापासून गंगापूर, दारणा, इत्यादी अनेक धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु केला. त्यामुळे गोदा काठालगत आठवडे बाजाराला प्रतिबंध केला आहे.

**अकोला** जिल्ह्यात काटेपूर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू आहे. काटेपूर्णा धरणाचे दहा दरवाजे उघडले असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**परभणी** जिल्ह्यात सेलु तालुक्यातल्या निम्न दुधना प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यात दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे नद्या-नाल्यांचा पूर कायम आहे. भामरागड तालुक्यात राहणाऱ्या जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापकांचा पुरात वाहून गेल्यानं मृत्यू झाला. पुराने  वेढलेल्या भामरागड गावातल्या आजारी आरोग्य सेविकेला पोलीस प्रशासनाने हेलिकॉप्टर मधून गडचिरोली जिल्हा रुग्णालयात दाखल केलं.

पुरामुळे राष्ट्रीय महामार्गासह ११ मार्गांवरची वाहतूक ठप्पच आहे.

कृषीमंत्री **दत्तात्रय भरणे** यांनी आज वाशिम जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली.

**सोलापूर** जिल्ह्यात उजनी आणि वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संततधार पावसामुळे पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी भीमा आणि नीरा नदीत विसर्ग सुरु आहे. नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पंढरपुरात चंद्रभागा नदीत पुराची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने नागरिकांच्या स्थलांतराची व्यवस्था केली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात गेल्या २४ तासात कृष्णा आणि पंचगंगा नद्यांच्या पाणी पातळीत सात फुटाने वाढ झाल्यामुळे श्रीक्षेत्र नृसिंहवाडी इथलं दत्त मंदिर पूर्णपणे पाण्याखाली गेलं आहे.

**यवतमाळ** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. आतापर्यंत अतिवृष्टीमुळे ६४० गावं बाधित झाला असून ९० हजार ९२४ हेक्टरवरच्या पिकांचं नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री **संजय राठोड** यांनी आज पुरस्थितीचा आढावा घेतला. अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या आणि जनावरांच्या नुकसानीचे तातडीनं पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**सांगली** जिल्ह्यात आज पावसाचा जोर काहीसा कमी झाल्यामुळ वारणा धरणातून विसर्ग कमी करण्यात आला. मिरजेत कृष्णा घाट इथं कृष्णा नदीनं इशारा पातळी ओलांडली आहे. सांगली शहरात कृष्णा नदीचं पाणी नागरी वस्तीत शिरल आहे. पुरबाधित ४७१ नागरिकांचं तसंच १०० जनावरांचं सुरक्षित ठिकाणी स्थलांतर केलं आहे. पालकमंत्री **चंद्रकांत पाटील** यांनी आज सांगली जिल्ह्यातील पूरस्थितीचा आढावा घेत नागरिकांना सतर्क राहण्याच आवाहन केलं आहे.

**रायगड** जिल्ह्यात मुरूड तालुक्यात मिठेखार इथं दरड कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला आहे.

**पुणे** जिल्ह्यात खडकवासला धरणातून आज सकाळी मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग केल्यामुळं पुणे शहरातल्या नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरलं आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेनं ९५० नागरिकांना निवारा केंद्रांमध्ये तसंच महापालिकेच्या शाळांमध्ये स्थलांतरीत केलं आहे.

राज्य सरकारनं ओला दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीनं मदत द्यावी अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष **हर्षवर्धन सपकाळ** यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

**<><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी आज संसद भवनात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, जे. पी. नड्डा, किरेन रिजिजू यांच्यासह भाजपा रालोआतल्या घटक पक्षांचे खासदार उपस्थित होते. अर्ज दाखल करण्यापूर्वी सी. पी. राधाकृष्णन यांनी संसद भवन संकुलातल्या प्रेरणास्थळावर भारताच्या विविध नेते आणि स्वातंत्र्यसैनिकांना पुष्पांजली अर्पण केली. सी. पी. राधाकृष्णन हे एक उत्कृष्ट उपराष्ट्रपती असतील, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपला समाज माध्यमावरच्या संदेशात व्यक्त केला आहे. उपराष्ट्रपती पदाची निवडणूक पुढच्या महिन्याच्या ९ तारखेला होणार आहे. माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी हे इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार आहेत.

**<><><>**

IIM, अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्था सुधारणा विधेयक, २०२५ ला संसदेची मंजुरी मिळाली आहे. लोकसभेत हे विधेयक आधीच मंजूर झालं होतं. आज राज्यसभेतही त्याला मंजुरी मिळाली. बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर विरोधकांनी आजही संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ केल्यामुळे कामकाज वारंवार आणि शेवटी दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभेत इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ सादर केलं. चर्चेनंतर ते मंजूर करण्यात आलं. ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक गेम्स यासह ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला चालना देणं आणि त्यावर नियमन आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. याद्वारे गेमिंग क्षेत्राबाबत राष्ट्रीय पातळीवर एक कायदेशीर चौकट तयार केली जाईल. तसंच कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गेम्सद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपानं पैशांच्या देवाणघेवाणीवर पूर्ण बंदी करायची तरतूद या विधेयकात आहे. तसंच या कायद्याचं उल्लंघन केल्यास तीन

वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद हे विधेयक करतं.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ‘घटना दुरुस्ती विधेयक २०२५’, ‘केंद्रशासित प्रदेश सरकार विधेयक, २०२५; ‘जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना विधेयक’, २०२५ लोकसभेत मांडलं.

**<><><>**

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या ८१व्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली आहे. नवी दिल्लीत वीरभूमी इथं राजीव गांधी यांच्या समाधीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी पुष्पांजली वाहिली.

मुंबईत राजभवनात देखील राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून त्यांना अभिवादन करण्यात आलं. त्यानंतर सर्व उपस्थितांना सद्भावना प्रतिज्ञा देण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात अधिकारी, कर्मचारी यांना सद्भावना दिनाची प्रतिज्ञा दिली.

**<><><>**

बेस्ट उपक्रमातल्या कामगारांच्या बेस्ट कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीत कामगार नेते शशांक राव यांच्या नेतृत्वाखालच्या पॅनलनं २१ पैकी १४ जागा जिंकत विजय मिळवला. तर सात जागा प्रसाद लाड, नितेश राणे आणि किरण पावसकर यांच्या नेतृत्वाखालच्या पॅनलनं जिंकल्या. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संघटनांनी एकत्र येत ही निवडणूक लढली होती. मात्र त्यांना एकही जागा मिळाली नाही.

ही निवडणूक म्हणजे महानगरपालिका निवडणुकीची लिटमस टेस्ट ठरली असून पालिका निवडणुकीत महायुतीचाच विजय होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला आहे.

**<><><>**

राज्यात ३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा केला जाणार असून यानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचं आयोजन मराठी भाषा विभागाने केलं आहे.

**<><><>**

येत्या २४ तासांत कोकणात बहुतांश ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडण्याची, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी खूप जोरदार पाऊस पडण्याची, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

हवामान विभागाने उद्यासाठी **मुंबई, पालघर आणि रायगड** जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला असून **ठाणे, पुणे, नाशिक आणि सातारा** जिल्ह्याला रेड अलर्ट दिला आहे.

**//<><><><>//**